# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: **pldvp@unipune.ac.in**

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — साफुपुवि/निववि/८४३ — दिनांक : १७/०७/२०१८

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक,

बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील

सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन करण्याकरिता मागविण्यात येणाऱ्या प्रस्तावांसाठी मार्गदर्शकतत्वांमधील नॅक/एन.बी.ए. अटींमधील बदलाबाबत...

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील महाविद्यालयांना कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन करण्यासाठी देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याकरीता प्रस्ताव सादर करताना सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये विद्यापीठ अधिकार मंडळाने सुधारणा/बदल केलेले आहेत. त्यानुसार नॅक/एन.बी.ए. मुल्यांकन अथवा पुर्न:मुल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए. मुल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत सादर करणाऱ्या महाविद्यालय/परिसंस्था यांना राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येणार होता व विहित मुदतीमधील नॅक/एन.बी.ए. प्रमाणपत्र असलेल्या महाविद्यालय/परिसंस्था यांना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजनाकरिता प्रस्ताव सादर करता येणार होता.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार नॅक/एन.बी.ए. मुल्यांकन बाबतच्या अटी शिथील करण्यात येवून सर्व महाविद्यालये/परिसंस्थांना कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी अर्थसहाय्याकरिता प्रस्ताव सादर करता येईल फक्त नॅक/एन.बी.ए. मुल्यांकन/पुर्न:मुल्यांकनाकरिता पात्र असलेली महाविद्यालये/परिसंस्था यांना कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी अर्थसहाय्याकरिता प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत चालु शैक्षणिक वर्षात नॅक/एन.बी.ए. मुल्यांकन करणार असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल. हमीपत्र सादर केल्यानंतर संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने नॅक/एन.बी.ए. मुल्यांकन अथवा पुर्न:मुल्यांकन बाबत काहीही कार्यवाही केली नाही तर सदर महाविद्यालये/परिसंस्था पुढील आर्थिक वर्षात गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करण्यास अपात्र राहतील याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करावेत, हि विनंती.

कळावे.

उपकुलसचिव

नियोजन व विकास